# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे – ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक: ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


परिपत्रक क्र. २८७/२०२५

**विषय : विद्यार्थी सुरक्षा विमा, विद्यार्थी विकास निधी, विद्यार्थी आरोग्य सेवा योजना, आपत्ती व्यवस्थापन निधी, विद्यापीठ क्रीडा मंडळ व शारीरिक शिक्षण मंडळ निधी, नोंदणी शुल्क, संगणक शुल्क व विकास निधीतील विद्यापीठ हिस्सा ऑनलाईन पध्दतीने पाठविण्याबाबत.**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थेत विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्कातील विद्यापीठाचा हिस्सा ऑनलाईन पध्दतीने चलनाद्वारे **दि. ०५ डिसेंबर, २०२५** पूर्वी विद्यापीठास पाठविण्यात यावा. विद्यापीठ हिस्सा पाठविताना, खालील सूचना विचारात घ्याव्यात.

१) सर्व विद्याशाखेतील सर्व प्रगत अभ्यासक्रम (पूर्वीचे पदविका), पदवी, पदव्युत्तर व पीएच्. डी. अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्कामधील विद्यापीठ हिस्सा मुद्दा क्र. ५ मध्ये नमूद शुल्क तक्त्यानुसार पाठवावा.

२) ऑनलाईन प्रो–रेटा व इतर निधी संबंधी माहिती भरण्याची ऑनलाईन प्रक्रिया बी.ओ.डी. पोर्टल अंतर्गत दिली आहे. **BOD Login** मध्ये 'प्रो–रेटा ऑनलाईन' ही लिंक वापरून सदरची माहिती भरावयाची आहे. या संदर्भात माहिती पुस्तिका (User Manual) महाविद्यालय/परिसंस्थेच्या Login मध्ये उपलब्ध आहे.

३) प्रो–रेटाचे चलन काढताना सर्व अभ्यासक्रमांचे मिळून एकच चलन काढावे. **प्रत्येक अभ्यासक्रमाचे वेगवेगळे चलन काढण्याची आवश्यकता नाही.** चलन भरल्यानंतर Print Report उपलब्ध होईल तो download करून त्यावर मा. प्राचार्य/संचालक यांनी स्वाक्षरी करून तो Upload Report येथे Upload करावा. **सदर Report/चलन/यादी इत्यादी विद्यापीठात स्वतंत्रपणे सादर करण्याची आवश्यकता नाही.**

**विशेष सूचना :**

१) विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्कातील विद्यापीठाचा हिस्सा आदेश क्रमांक PGS/676, Dt. 28.2.2020 नुसार विद्यापीठास पाठवायचा आहे.

२) अश्वमेध शुल्क (क्रीडा महोत्सव) वाढीव शुल्क क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संदर्भ पत्र क्र. विक्रीमं/३/६७९६, दि. २० ऑक्टोंबर, २०२३ अन्वये घेण्यात येत आहे.

३) रासेयो स्वयंनिर्वाह एकक शुल्क हे राष्ट्रीय सेवा योजना या विभागाचे संदर्भ पत्र क्र. रासेयो/२०२४–२५/१८७, दि. २०/०८/२०२४ अन्वये घेण्यात येत आहे.

४) व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शुल्क व्यावसायिक दरानुसार पाठवावे.

५) परदेशी/सार्क देशातील विद्यार्थ्यांच्या शुल्कातील विद्यापीठाचा हिस्सा संदर्भ क्र. आयएससी/१०५० व १०५०–ए, दि.९ जून, २००८ नुसार पाठवावा.

६) नियमित प्रवेशित प्रती विद्यार्थ्यामागे रु. १५/— प्रमाणे स्थानिक विभागीय क्रीडा समितीचा (उदा. पुणे शहर/अहमदनगर/पुणे जिल्हा/नाशिक) देय असलेला प्रो–रेटा संबंधित विभागीय समितीकडे पाठविणे आवश्यक आहे. सदर प्रो–रेटा न भरल्यास संबंधित महाविद्यालयातील/परिसंस्थेतील खेळाडूंना आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत सहभाग घेता येणार नाही. (टिप — वरील बाबतचे विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ यांचे जावक पत्र क्र. UBS/PRORATA/३.१/००४४, दि. २८ ऑगस्ट, २०२४ नुसार कार्यवाही करावी).

५) **शुल्काचा तक्ता**

| अ. क्र. | विभाग | निधी/शुल्काचे शिर्षक | अभ्यासक्रम | विद्यापीठ हिस्सा रु.मध्ये | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | व्यावसायिक अभ्यासक्रम | | अव्यावसायिक अभ्यासक्रम |
| | | | | पदवी | पदव्युत्तर | |
| १ | विद्यार्थी विकास मंडळ | विद्यार्थी विकास निधी | पदवी व पदव्युत्तर | ४० | २० | ४० |
| | | विद्यार्थी सुरक्षा विमा निधी | पदवी व पदव्युत्तर | २० | | २० |
| | | आपत्ती व्यवस्थापन निधी | पदवी व पदव्युत्तर | १० | | १० |
| २ | राष्ट्रीय सेवा योजना | रासेयो स्वयंनिर्वाह एकक शुल्क | पदवी व पदव्युत्तर | २० | | २० |
| ३ | विद्यापीठ क्रीडा मंडळ | विद्यापीठ जिमखाना शुल्क | पदवी व पदव्युत्तर | ५० | | ५० |
| | | अश्वमेध शुल्क (क्रीडा महोत्सव) | पदवी व पदव्युत्तर | २६ | | २६ |
| | | कॉर्पस फंड | पदवी व पदव्युत्तर | ०४ | | ०४ |
| | | स्पोर्टस फंड ( FIT India ) | पदवी व पदव्युत्तर | ५० | | ५० |
| ४ | शैक्षणिक प्रवेश विभाग | नोंदणी शुल्क | पदवी व पदव्युत्तर | २५ | | २५ |
| | | संगणक शुल्क | पदवी व पदव्युत्तर | २५ | | २५ |
| | | विकास निधी | पदवी व पदव्युत्तर | ५० | | २५ |
| ५ | आरोग्य केंद्र | विद्यार्थी आरोग्य सेवा योजना | पदवी | २० | | २० |

वरील सूचना विचारात घेऊन शुल्क/निधीतील विद्यापीठ हिस्सा पाठवावा. पुढे असेही कळविण्यात येते की, अंतिम मुदतीपर्यंत चलनप्राप्त न झाल्यास अशा महाविद्यालयाबाबत विद्यापीठ अधिकार मंडळ जो निर्णय घेईल तो बंधनकारक राहील, कृपया याची नोंद घ्यावी.

3/11/2025

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव

गणेशखिंड, पुणे — ४११००७
संदर्भ : शै. प्रवेश/2820
दिनांक : 03/११/२०२५

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत :
मा. वित्त व लेखा अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ.
मा. संचालक, विद्यार्थी विकास, प्रस्तुत विद्यापीठ.
मा. संचालक, क्रीडा व शारिरीक शिक्षण मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ.
मा. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, प्रस्तुत विद्यापीठ.
मा. आरोग्य अधिकारी, आरोग्य केंद्र, प्रस्तुत विद्यापीठ.